Aayushi International Interdisciplinary Research Journal (AIIRJ)
VOL- IX | ISSUE- III | MARCH | 2022 | PEER REVIEW e-JOURNAL | IMPACT FACTOR 7.331 | ISSN 2349-638x

# महाराष्ट्र राज्यातील लोकसंख्या वृद्धीदराचा भौगोलिक अभ्यास

**प्रा.श्रीकांत लक्ष्मण बेंबडे**
भूगोल विभाग
महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालय,
उदगीर जि.लातूर

**सारांश (ABSTRACT)**

प्रस्तुत शोधनिबंधात लोकसंख्येचा अभ्यास करून महाराष्ट्र राज्याच्या लोकसंख्येच्या वृद्धीदराचा अभ्यास करण्याचा प्रयत्न केला आहे. त्यासाठी महाराष्ट्र राज्य हा अभ्यास घटक निवडलेला आहे. या अभ्यासासाठी १९९१ ते २०११ या दशकातील कालावधी निवडलेला आहे. या लोकसंख्या वृद्धीकरिता भौगोलिक परिस्थिती नागरीकरण शेती व औद्योगिक विकास आणि लोकसंख्याशास्त्रीय घटकांचा निकटचा संबंध दर्शवितात.


बीजसंज्ञा : *लोकसंख्या वृद्धी, जनगणना*

## प्रस्तावना (Introduction)

लोकसंख्या वृद्धी ही एक लोकसंख्याशास्त्रीय प्रक्रिया आहे. या प्रक्रियेत सर्व लोकसंख्याशास्त्रीय घटक प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणे त्यात समाविष्ठ झालेले असतात. आधुनिक काळामध्ये औद्योगिकीकरणामुळे नागरीकरण मोठ्या प्रमाणावर होत आहे. अनेक प्रदेशात औद्योगिकीकरण वेगाने होत असल्याने स्थलांतराचे प्रमाण देखील मोठ्या प्रमाणात होत आहे. त्यामुळे वेगवेगळया समस्या निर्माण होतात. यात स्थलांतरण हा घटक दिसून येतो. या दृष्टिकोनातून प्रस्तुत शोधनिबंधामध्ये महाराष्ट्र राज्यातील लोकसंख्या वृद्धी जाणून घेण्याचा प्रयत्न करण्यात आलेला आहे.

## अभ्यासक्षेत्र (Study Area)

महाराष्ट्र राज्य हे क्षेत्रफळाच्या दृष्टीने भारतातील तिस-या क्रमांकाचे राज्य आहे. या राज्याचा विस्तार हा १५°४१' उत्तर अक्षवृत्त हे २२°६' उत्तर अक्षवृत्त आहे व रेखावृत्तीय विस्तार हा ७२°३६' पूर्व रेखांश ते ८०°५४' पूर्व रेखावृत्त इतका आहे. एकूण लांबी ही पूर्व-पश्चिम ८०० कि.मी. व रुंदी दक्षिण-उत्तर ७२० कि.मी. आहे. एकूण क्षेत्रफळ हे ३.०६ लाख चौ.कि.मी. आहे.




महाराष्ट्राने देशाच्या ९.३६ टक्के भाग व्यापला आहे. महाराष्ट्राला एकूण समुद्रकिनारा ७२० कि.मी. लाभलेला आहे. महाराष्ट्र राज्याचा आकार हा व्हीव्ही त्रिकोणाकृती, दक्षिणेस चिंचोळा तर उत्तरेस रूंद आहे. पाया कोकणात व निमुळते टोक विदर्भात आहे. महाराष्ट्र राज्याची स्थापना १ मे १९६० रोजी झाली. हे राज्य ऐतिहासिक व सांस्कृतिक, नैसर्गिक खनिजसंपत्तीचे वरदान लाभलेले राज्य आहे. या राज्याचा विस्तार भारत देशाच्या पश्चिमेला असून राज्याच्या वायव्येस गुजरात, उत्तरेस मध्यप्रदेश, पुर्वेस छत्तीसगड, आग्नेयेस तेलंगणा, दक्षिणेस कर्नाटक व नैऋत्येस गोवा ही राज्ये आहेत.

प्रशासकीय सोयीसाठी राज्याची विभागणी ३६ जिल्ह्यात व ६ महसूल विभागात केली गेली आहे. सन २०११ च्या जनगणनेनुसार राज्याची लोकसंख्या १२.१४ कोटी होती. हे राज्य लोकसंख्येनुसार देशात दुस-या क्रमांकाचे राज्य आहे. सन १९९१ नुसार महाराष्ट्राची लोकसंख्या ही ७८,९३७,१८७ होती तर सन

२००१ नुसार ही लोकसंख्या वाढलेली दिसून येते. वर्ष २००१ नुसार महाराष्ट्र राज्याची लोकसंख्या ही ९६,८७८,६२७ इतकी होती. तर घनता ३२४ चौ.कि.मी. होती. सन २०११ च्या जनगणनेनुसार महाराष्ट्र राज्याची एकूण लोकसंख्या ही ११२३७४३३३ इतकी होती. २००१ ते २०११ या कालावधीत लोकसंख्या वाढ कमी झालेली दिसून येते. या अल्पावधीतच झालेल्या लोकसंख्या वृद्धीमध्ये काही बाबतीत सकारात्मक तर काही बाबतीत नकारात्मक परिणाम झालेला जाणवतो.

**उद्देश (Objective)**

महाराष्ट्र राज्यातील लोकसंख्या वृद्धीचा दर अभ्यासणे हा प्रमुख उद्देश समोर ठेवून प्रस्तुत शोधनिबंध तयार करण्यात आला आहे.

**सांख्यिकीय माहिती व संशोधन पद्धती (Database and Methodology)**

सदरचा अभ्यास दुय्यम माहिती स्रोतावर आधारित असून ही सांख्यिकीय माहिती सन १९९१, २००१ व २०११ या कालावधीतील आहे. दशवार्षिक लोकसंख्येचा वृद्धीदर काढण्यासाठी खालील सुत्राचा अवलंब करण्यात आलेला आहे.

$$\text{लोकसंख्या वृद्ध} \quad \frac{\text{चालू जनगणना वर्षाची}}{\text{लोकसंख्या आधार वर्षातील}} \times १००$$

**सारणी क्र.१**


**महाराष्ट्र राज्याची लोकसंख्या (सन १९९१ ते २०११)**

| वर्ष | लोकसंख्या | शेकडा वृद्धीदर |
|---|---|---|
| **१९९१** | ७८,९३७,१८७ | २५.७३ |
| **२००१** | ९६,८७८,६२७ | २२.७३ |
| **२०११** | ११२,३७४,३३३ | १५.९९ |

स्त्रोत : सामाजिक-आर्थिक समालोचन, महाराष्ट्र

**आलेख क्र.१**

**महाराष्ट्र राज्याची लोकसंख्या (सन १९९१ ते २०११)**




लोकसंख्येची वृद्धी काळानुरूप वाढणारी व सर्वत्र सारखी नाही. हे महाराष्ट्र राज्यातील लोकसंख्या वृद्धीदर सारणी क्र.१ व आलेख क्र.१ वरून स्पष्ट होते. वरील सारणी व आलेखावरून १९९१ ते २००१ या दशकात लोकसंख्या वृद्धी दर २२.७३ टक्के इतका होता. हा दर १९८१-१९९१ सालच्या तुलनेत ३ टक्के कमी झाला आहे. एकूण लोकसंख्येत १७,९४१,४४० इतकी वाढ झालेली दिसून येते. त्यानंतर वर्ष २००१ ते २०११ या दशकात १५,४९५,७०६ इतकी लोकसंख्या वाढ झाली. यात सन २०११ ची एकूण महाराष्ट्राची लोकसंख्या ही ११२,३७४,३३३ इतकी आहे. सन २०११ मध्ये शेकडा वाढ व वृद्धीदर हा कमी झाला आहे. सन २०११ मध्ये वृद्धी ही १५.९९ टक्के इतकी होती. ती सन २००१ च्या तुलनेने ६.७४ टक्के इतकी कमी आहे.

**निष्कर्ष (Conclusion)**

महाराष्ट्र राज्य लोकसंख्या वृद्धी परिणाम लोकसंख्या वृद्धीचा अधिक भार नैसर्गिक साधनसंपत्तीवर वाढत आहे. तसेच उद्योगधंद्यातील वाढत्या रोजगार निर्मितीमुळे इतर राज्यातील मजुरांचे स्थलांतर हे मोठ्या प्रमाणात झालेले आहे. सोबतच विविध उद्योगांची निर्मिती, व्यापारपेठांचा विस्तार व शैक्षणिक सोयीसुविधा इत्यादींच्या उपलब्धतेमुळे लोकसंख्येत फार मोठ्या प्रमाणात वाढ झालेली आहे. राज्यातील पर्यटन, शिक्षण, सांस्कृतिक घटक हे देखील फार मोठ्या प्रमाणात या लोकसंख्या वाढीवर परिणाम करतात.

१९९१ ते २००१ या दशकात लोकसंख्या वृद्धीदर हा २२.७३ टक्के इतका होता. १९८१ ते १९९१ या दशकाच्या मानाने तो ३ टक्के नि कमी होता. (२५.७३ टक्के) सन २००१ ते २०११ या दशकात लोकसंख्येचा वृद्धीदर हा १५.९९ टक्के इतका होता. या अल्पावधीत झालेली लोकसंख्या वृद्धी ही ९.७४ टक्के नी कमी झाली. या लोकसंख्या वृद्धीवर काही ठिकाणी सकारात्मक तर काही ठिकाणी नकारात्मक परिणाम जाणवतो.

**संदर्भ (References)**

१. लोकसंख्या भूगोल-डॉ.शंकरराव शेटे, अभिजीत पब्लिकेशन, लातूर, २००३
२. लोकसंख्या भूगोल-के.ए. खतीब, विद्या बुक पब्लिशर्स, औरंगाबाद, २०११
३. लोकसंख्या भूगोल-डॉ.व्ही.जे. पाटील
४. सामाजिक-आर्थिक समालोचन, महाराष्ट्र (१९८१, १९९१, २००१, २०११)
५. भारतीय जनगणना अहवाल सन १९८१, १९९१, २००१ व २०११
६. Ghosh B.N. (1987), 'Fundamental of Population Geography', Sterling Publication, New Delhi.